## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक १०/१०/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६९/२०११/जा.८१४ दिनांक १३/१०२०११ व ०४/११/२०११.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नवघर पोलिस ठाणे यांचे टपालामार्फत प्राप्त झालेले दि.२५/१०/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक यांचे दिनांक २५/१०/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नवघर पोलिस ठाणे यांचे दि. १८/११/२०११ रोजीचे अभिवेदन.

६) मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक यांचे दिनांक १८/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

क्र.निशि/अंमल/प्र.क्र.६९/२०११/जा. ९८०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०२/१२/२०११.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक ०७/१०/२०११ रोजी या कार्यालयास गोपनिय बातमीदाराकडून मिळालेल्या माहिती नुसार येथील अधिकारी / कर्मचारी पथक देशमुखवाडी, नेहा अपार्टमेंट बी विंग समोर, म्युनिसिपल शाळेच्या बाजूला, विसावा झोपडपट्टी मधील मोकळी जागा, मिठागर रोड, मुलूंड पूर्व, मुंबई ८१ येथे आले व तेथील मेकळ्या जागेत साठा केलेले गॅस सिलेंडर पाहिले. त्याबाबत पथकाने आजूबाजूस चौकशी केली असता, सदरचा गॅस सिलेंडरचा साठा हा मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सी, मुलूंड पूर्व, संत रामदास रोड यांचा असल्याबाबत समजले. सदर बाबत पथकाने अधिक चौकशी केली असता, सदर गॅस कंपनीचे व्यवस्थापक महादेव गनू पाटील हे घटनास्थळी आल्यावर त्यांना विचारणा केली असता सदर गॅस सिलेंडर हे त्यांच्याच त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे असल्याचे त्याने सांगितले. याबाबत पथकाने सदरचा साठा उघड्या जागी ठेवल्याबाबत त्यांच्या एजन्सीची माहिती पथकास मिळाल्याचे सांगून सदर ठिकाणी

महादेव पाटील यांना उघड्या जागी ठेवलेल्या गॅस सिलेंडरच्या जागेबाबतच्या कागदपत्रांची विचारणा केली असता, त्याबाबत त्याच्याकडे कोणताही कायदेशिर परवानगीचे कागदपत्र नसल्याचे तसेच साठा साठवणूक करण्याचे विस्फोटक परवाना त्यांच्याकडे नसल्याचे सांगून महादेव गनू पाटील हे छातीत दुखत आहे असे सांगून घटनास्थळावरुन निघून गेले.

तद्नंतर पथकातील अधिकाऱ्यांना संशय आला की, सदरची बाब ही अवैध व बेकायदेशिर आहे. याबाबत त्यांनी त्यांच्या वरिष्ठांना सदर बाबतची माहिती दिली व वरिष्ठांनी कार्यवाही करण्याचे आदेशित केल्यानुसार सदर ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेतील गॅस सिलेंडर साठ्याची पंचांसमवेत पंचनामा करुन साठा जप्त केला. त्यानंतर पथकातील अधिकारी हे नवघर पोलिस ठाणे येथे उपस्थित राहून सदर घटनेची माहिती रात्रपाळी कर्तव्यावर असलेले सहाय्यक पोलिस निरिक्षक, श्री. सुर्यवंशी तसेच वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांना दिली.

अशाप्रकारे मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक, गॅस एजन्सीचे व्यवस्थापक, महादेव गनू पाटील व सदरचा साठा उघड्या जागेवर ठेवून घेण्यासाठी परवानगी देणारा जागा मालक यांनी संगणमताने नमूद ठिकाणी गॅस सिलेंडरचा अवैध व बेकायदेशिर साठा केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ तसेच (२) दि लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (रेग्युलेशन ऑफ सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन) ऑर्डर २००० चे कलम ३ (१)(ब) व (क) आणि ३ (२), ३ (३) आणि ३ (४) तसेच ४ (२) कलम ६ तसेच क ७ (१), (ब), (क) चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द नवघर पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ११/२०११, दि.०८/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | ४७ किलो वजनाचे भरलेले गॅस सिलेंडर | १८ नग | १,१५,५०६/- |
| २ | ४७ किलो वजनाचे रिकामे गॅस सिलेंडर | ७ नग | २३,८००/- |
| ३ | १९ किलो वजनाचे भरलेले गॅस सिलेंडर | ७१ नग | २,०७,३२०/- |
| ४ | १९ किलो वजनाचे रिकामे गॅस सिलेंडर | ३३ नग | ५६,१००/- |
| ५ | घरगुती वापराचे भरलेले गॅस सिलेंडर | ७ नग | ११,५६४/- |
| | | एकूण | ४,१४,२९०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून, नवघर पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ११/२०११, दि.०८/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेला उपरोक्त मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये ?

याबाबत वाचा क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि. २५/१०/२०११ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दि.२५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक घनश्याम बजाभाऊ कदम व मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे व्यवस्थापक महादेव गनू पाटील हे उपस्थित राहिले. मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तसेच साठवणूकीस परवानगी देणारा जागा मालक हे उपस्थित राहिले नाहीत. तथापी, वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांनी वाचावे क्र. ३ अन्वये टपालामार्फत लेखी अभिवेदन सादर केले. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्याची एक संधी म्हणून पुढील सुनावणी दिनांक १८/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस श्री. प्रविण पांडुरंग निवाते, पोलिस शिपाई हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक घनश्याम बजाभाऊ कदम व मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे व्यवस्थापक महादेव गनू पाटील हे उपस्थित राहिले. मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक यांनी त्यांचे वाचावे क्र. ६ अन्वये लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

दि.२५/१०/२०११ रोजीचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात तसेच दि.१८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित श्री. प्रविण पांडुरंग निवाते, पोलिस शिपाई यांनी सादर केलेल्या वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे लेखी अभिवेदनात, आरोपी नामे घनश्याम बजाभाऊ कदम, गायत्री बिल्डींग, एल.टी. रोड, मुलूंड पुर्व, मुंबई येथे २००१ पासून राहत आहेत. आरापी नामे महादेव गनू पाटील हे घनश्याम बजाभाऊ कदम याचे गॅस एजन्सीमध्ये मॅनेजर कम वॉचमेनचे काम करत आहेत. दोन्ही आरोपीतांचा जबाब नोंद केला असता, ट्रक खराब झाल्याने वर नमूद ठिकाणी रिकामी ४० व भरलेले ९६ असे एकूण १३६ गॅस सिलेंडर एर्मन्सी गॅस सिलेंडर उतरविल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे. हिंदुस्थान पेट्रोलियम लिमिटेड याचे बरोबर केलेल्या ५ वर्षाच्या कराराबाबतचे कागदपत्र पोलिस ठाणेस आणून सादर केलेले आहेत. नमूद गॅस सिलेंडर बाबत घटनास्थळी जाऊन साक्षीदारांचे जबाब नोंद केले असता, नमूद गॅस सिलेंडर हे ५ ते ६ दिवसापासून नमूद जागी दिसून येत असल्याचे समजले आहे. सदरचे गॅस सिलेंडर हे आरोपी कदम यांच्याच ताब्यात वितरण व विक्री करीता असल्याचे समजते. नमूद गॅस सिलेंडर साठविण्याकरीता नवघर पोलिस ठाणेकडे कोणतीही सुविधा नसल्याने नमूद गॅस

सिलेंडरचा साठा पोलिसांच्या पहाऱ्यामध्ये घटनास्थळीच ठेवण्यात आला आहे. तसेच जप्त करण्यात आलेले १३६ गॅस सिलेंडर हे मोकळ्या मैदानात उघड्यावर ठेवणे अतिशय धोकादायक आहे. त्यामुळे अनुचित प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी वरील गॅस सिलेंडर साठ्याचे लवकरात लवकर विल्हेवाट लावण्याबाबत कारवाई करावी, असे नमूद केले आहे.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक घनश्याम बजाभाऊ कदम यांनी युक्तीवाद केला की, आपल्या पथकाने ज्यावेळी त्यांच्या सिलेंडरचा साठा जप्त केला, त्यावेळी त्यांचा ट्रक बिघडला होता. त्यामुळे त्यांनी रस्त्याच्या बाजूच्या मैदानात सिलेंडर उतरवले होते व त्यांचा ट्रक दुरुस्तीसाठी गेला होता व तो परत येऊन साठा घेऊन जाणार होता. परंतू आपल्या पथकाने वरील वस्तूस्थिती ऐकून घेऊन पोलिस एफ.आय.आर. करुन केस रजिस्टर केली. तो त्यावेळी दि.०७/१०/२०११ रोजी त्याचे वडिल हॉस्पीटममध्ये असल्यामुळे गावी होता. ती वस्तूस्थिती पथकाला सांगितली. पण त्यांना त्यांचे कर्तव्य करायचे होते. ते एच.पी. गॅसचे अधिकृत डिलर आहेत. त्याचे वडाळा येथे गोडावून आहे. त्याचा सर्व साठा वाहनावर असतो. तो चेंबूर वरुन येतो. तरी कृपया वरील परिस्थितीचा विचार करुन त्याचे सिलेंडर त्यांना परत करावेत, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले. तसेच दि.१८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस सादर केलेल्या लेखी निवेदनामध्ये त्यांनी यापूर्वी दि.२५/१०/२०११ रोजी सादर केलेले निवेदन कायम असून त्यांचे जप्त करण्यात आलेले १३६ सिलेंडर त्यांना परत मिळावे, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०७/१०/२०११ रोजी या कार्यालयास गोपनिय बातमीदाराकडून मिळालेल्या माहिती नुसार येथील अधिकारी/कर्मचारी पथक देशमुखवाडी, नेहा अपार्टमेंट बी विंग समोर, म्युनिसिपल शाळेच्या बाजूला, विसावा झोपडपट्टी मधील मोकळी जागा, मिठागर रोड, मुलूंड पूर्व, मुंबई ८१ येथे आले व तेथील मोकळ्या जागेत साठा केलेले गॅस सिलेंडर पाहिले. त्याबाबत पथकाने आजूबाजूस चौकशी केली असता, सदरचा गॅस सिलेंडरचा साठा हा मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सी, मुलूंड पूर्व, संत रामदास रोड यांचा असल्याबाबत समजले. सदर बाबत पथकाने अधिक चौकशी केली असता, सदर गॅस कंपनीचे व्यवस्थापक महादेव गनू पाटील हे घटनास्थळी आल्यावर त्यांना विचारणा केली असता सदर गॅस सिलेंडर हे त्यांच्याच त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे असल्याचे त्याने सांगितले. याबाबत पथकाने सदरचा साठा उघड्या जागी ठेवल्याबाबत त्यांच्या एजन्सीची माहिती पथकास मिळाल्याचे सांगून

CONTROLLER OF RATION

सदर ठिकाणी महादेव पाटील यांना उघड्या जागी ठेवलेल्या गॅस सिलेंडरच्या जागेबाबतच्या कागदपत्रांची विचारणा केली असता, त्याबाबत त्याच्याकडे कोणताही कायदेशिर परवानगीचे कागदपत्र नसल्याचे तसेच साठा साठवणूक करण्याचे विस्फोटक परवाना त्यांच्याकडे नसल्याचे सांगून महादेव गनू पाटील हे छातीत दुखत आहे असे सांगून घटनास्थळावरुन निघून गेले. तद्नंतर पथकातील अधिकाऱ्यांना संशय आला की, सदरची बाब ही अवैध व बेकायदेशिर आहे. याबाबत त्यांनी त्यांच्या वरिष्ठांना सदर बाबतची माहिती दिली व वरिष्ठांनी कार्यवाही करण्याचे आदेशित केल्यानुसार सदर ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेतील गॅस सिलेंडर साठ्याची पंचांसमवेत पंचनामा करुन साठा जप्त केला. त्यानंतर पथकातील अधिकारी हे नवघर पोलिस ठाणे येथे उपस्थित राहून सदर घटनेची माहिती रात्रपाळी कर्तव्यावर असलेले सहाय्यक पोलिस निरिक्षक, श्री. सुर्यवंशी तसेच वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांना दिली. यावरुन ४७ किलो वजनाचे भरलेले १८ व रिकामी ७ गॅस सिलेंडर, १९ किलो वजनाचे भरलेले ७१ व रिकामी ३३ गॅस सिलेंडर तसेच,घरगुती वापराचे भरलेले ७ गॅस सिलेंडर असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक घनश्याम बजाभाऊ कदम यांनी केलेल्या खुलाशात, पथकाने ज्यावेळी त्यांच्या सिलेंडरचा साठा जप्त केला. त्यावेळी त्यांचा ट्रक बिघडला होता. त्यामुळे त्यांनी रस्त्याच्या बाजूच्या मैदानात सिलेंडर उतरवले होते व त्यांचा ट्रक दुरुस्तीसाठी गेला होता व तो परत येऊन साठा घेऊन जाणार होता. तसेच ते एच.पी. गॅसचे अधिकृत डिलर असून त्यांचे वडाळा येथे गोडावून आहे. त्यांचा सर्व साठा वाहनावर असतो व तो चेंबूर वरुन येतो. परंतू घटनास्थळी केलेल्या पंचनाम्यात झोपडपट्टीतील रहिवाशांकडे सदर गॅस सिलेंडर कोणाच्या मालकीचे आहेत, याबांबत विचारणा केली असता, त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. तद्नंतर महादेव गनू पाटील हे घटनास्थळी उपस्थित राहिले असता, जप्त गॅस सिलेंडरबाबत त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्र उपलब्ध नसल्याचे सांगून सदर आरोपी घटनास्थळापासून नकळत निघून गेल्याचे पंचनाम्यात नमूद आहे.

तथापी, वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांनी केलेल्या खुलाशात, आरोपी नामे घनश्याम बजाभाऊ कदम व महादेव गनू पाटील या दोन्ही आरोपीतांचा जबाब नोंद केला असता, ट्रक खराब झाल्याने वर नमूद ठिकाणी रिकामी ४० व भरलेले ९६ असे एकूण १३६ गॅस सिलेंडर एर्मन्सी गॅस सिलेंडर उतरविल्याचे त्यांनी नमूद केलेले आहे. तसेच पोलिसांनी जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडर बाबत घटनास्थळी जाऊन साक्षीदारांचे जबाब नोंद केले असता, सदरचे जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडर हे ५ ते ६ दिवसापासून नमूद जागी मोकळ्या मैदानात उघड्यावर ठेवल्याचे जबाबात नमूद केले आहे.

परंतू घनश्याम बजाभाऊ कदम यांनी सुनावणीच्या वेळेस केलेल्या खुलाशा सोबतचे कागदपत्रांमध्ये दिनांक ०७/१०/२०११ रोजीचे मे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. या कंपनीकडून त्यांच्या त्रिमुर्ती गॅस सर्व्हिस यांना गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्यात आलेल्या चलनाचे अवलोकन केले असता, सदर दिवशी १४.२ कि.ग्रॅ.

क्षमतेचे फक्त ३०० घरगुती वापराचे सिलेंडर वितरीत केल्याचे दिसून येत आहे. तथापी, घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या एकूण १३६ सिलेंडर पैकी फक्त ७ सिलेंडर हे घरगुती वापराचे असून उर्वरीत १२९ सिलेंडर वाणिज्य वापराचे असल्याचे दिसून येत आहे.

आरोपी याने सुनावणीच्यावेळी केलेला खुलासा व घटनास्थळी दिलेला जबाब एकमेकाशी विपर्यास्त आहे. यावरुन आरोपी यांनी सुनावणीचे वेळी दिलेले खुलासे मोघम स्वरुपाचे असून, सदर गुन्ह्यात जप्त केलेले गॅस सिलेंडर परत मिळण्याबाबत तसेच मालकी हक्काबाबत मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक घनश्याम बजाभाऊ कदम यांनी दावा केला असला, तरी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडर्स हे त्यांच्या मालकीचे असल्याचे निष्पन्न होत नाही व त्याबाबत त्यांनी जप्त केलेल्या गॅस सिलेंडर्सबाबत कोणतेही अधिकृत कागदपत्रे अथवा पुरावे सादर केले नसल्याने सदरचे गॅस सिलेंडर त्यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गैरव्यवहार करण्याच्या उद्देशाने अनधिकृतपणे खरेदी केले असल्याचे दिसून येते. यावरुन सद्यःस्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तुस्थितीवरुन प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेले गॅस सिलेंडरचा साठा हा अवैध व अनधिकृत असल्याचे सकृतदर्शनी दिसून येतो. सबब, जप्त करण्यात आलेले व्यावसायीक व घरगुती वापरातील संपूर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये नवघर पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ११/२०११, दि.०८/१०/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) जप्त करण्यांत आलेले ४७ किलो वजनाचे भरलेले १८ व रिकामी ७ गॅस सिलेंडर, १९ किलो वजनाचे भरलेले ७१ व रिकामी ३३ गॅस सिलेंडर तसेच घरगुती वापराचे भरलेले ७ गॅस सिलेंडर साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर शासन जमा करण्यात आलेले संपुर्ण गॅस सिलेंडर्सचा साठा राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०, पी डि मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई यांना देवून, त्यापोटी त्यांचेकडून प्राप्त होणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे मालक
२) मे. त्रिमुर्ती गॅस एजन्सीचे व्यवस्थापक महादेव गनू पाटील
३) साठवणूकीस परवानगी देणारा जागा मालक
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, नवघर पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजांवून त्याची दिनांकित पोच या कार्यालयांस तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) राज्य समन्वय तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, १०-पी, डी-मेलो रोड, वाडीबंदर, मुंबई १० यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.